www.yuvakadhar.in    E mail - dainikyuvakaadhar@gmail.com    facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे
संपर्क 9220403509 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर   निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील   सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २    अंक : 229 वा    रविवार दि. ४ मे २०२५    किंमत : ४ रु    पृष्ठ : ४    RNI MAHMAR/2023/89514

# पाकिस्तानमध्ये लॉकडाउन?

## भारताकडून हल्ल्याच्या भीतीने मदरसे, हॉटेल आणि पर्यटकांसंदर्भात मोठा निर्णय

: काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानमध्ये भयान शांतता पसरली आहे. भारताकडून पाकिस्तानवर संभाव लष्करी कारवाईची भीती असल्याने पाकिस्तानने सुरक्षेच्या दृष्टीने पीओके प्रशासनाने अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. पंतप्रधान चौधरी अन्वर-उल-हक यांनी गुरुवारी विधानसभेत निवेदन देताना असे संकेत दिले की, जर परिस्थिती आणखी बिकट झाली तर या प्रदेशात आणीबाणी जाहीर करण्यात येऊ शकते. या विधानानंतर संपूर्ण परिसरात अस्वस्थता आणि सतर्कता वाढली पाहिला मिळत आहे. पाकिस्तानमध्ये पीओके सरकारने नियंत्रण रेषेजवळील संवेदनशील भागात पर्यटकांच्या हालचालींवर बंदी घालण्यात आली आहे. नीलम व्हॅली आणि



लीपा व्हॅली सारख्या भागात कडक देखरेख वाढवण्यात आली आहे. अधिकाऱ्यांनी मार्बल चेकपोस्टवरून अनेक पर्यटकांना परत पाठवले आहेत. तर स्थानिक रहिवाशांना नियंत्रण रेषेकडे जायला बंदी करण्यात आली आहे. तसंच, नागरिकांना सुरक्षा यंत्रणांना पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन केलं आहे. गुप्तचर माहितीच्या आधारे, पीओके प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून धार्मिक मदरसे 10 दिवसांसाठी बंद करण्यात आले आहे. भारत या मदरशांना दहशतवादी प्रशिक्षण केंद्रे म्हणून घोषित करून कारवाई करू शकतो अशी भीतीने पाकिस्तानने निर्णय घेतला आहे. पीओकेचे कायदा मंत्री मियां अब्दुल वाहिद यांनी भारतावर तीव्र हल्ला चढवत म्हटलं की, ते एका 'धूर्त, निर्दयी आणि कट रचणाऱ्या' शत्रूशी सामना करत आहेत आणि कोणत्याही प्राणघातक कारवाईची शक्यता नाकारता येत नाही.

त्याच वेळी, भारताकडून संभाव्य आक्रमण झाल्यास सामान्य जनतेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने तयारी वाढवली आहे. पीओके सरकारने अन्न, औषधे आणि इतर आवश्यक वस्तूंचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आपत्कालीन निधीमध्ये 1 अब्ज रुपये हस्तांतरित केले आहेत. याशिवाय, हॉटेल्स, गेस्टहाऊस आणि लग्नाच्या सभागृहांच्या मालकांनी सैन्याच्या समर्थनार्थ त्यांच्या आस्थापना तात्पुरत्या स्वरूपात हस्तांतरित करण्याच आवाहन केलं आहे. त्याचा परिणाम हवाई वाहतुकीवरही झाल्याचा पाहिला मिळत आहे. मे महिन्यात कराची आणि लाहोर हवाई क्षेत्रात दररोज आठ तासांसाठी (सकाळी 8 ते दुपारी 4) उड्डाणे बंद राहणार आहे. त्याचा परिणाम गिलगिट-बाल्टिस्तानपर्यंत पोहोचला आहे, जिथून इस्लामाबादला जाणारी उड्डाणे सलग दुसऱ्या दिवशी रद्द करावी लागली. गिलगिट आणि स्कार्दूला जाणाऱ्या विमान सेवांवरही परिणाम झाला आहे. तसंच, इस्लामाबाद विमानतळावरील खराब हवामानामुळे, अनेक आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत उड्डाणे एकतर उशिराने झाली किंवा इतर विमानतळांवर वळवण्यात आली.

# जलतरण क्षेत्रात कु.अंजना प्रधान हिस नाशिक जिल्हा क्रीडा पुरस्कार प्रदान



दैनिक युवक आधार
मराठवाडा विभाग प्रतिनिधी:-
श्री रमेश सुरशे(छत्रपती संभाजीनगर)

१ मे २०२५ महाराष्ट्र दिनी नाशिकच्या पोलीस ग्राउंडवर,"जिल्हा क्रीडा पुरस्कार" मा.गिरीशजी महाजन यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. अंजनाने आपल्या अपंगत्वावर मात करत जलतरण या क्षेत्रात अनेक पदके प्राप्त केली आहेत,त्याचाच हा गौरव !! आपल्या अपंगत्वावर मात करत जिद्धीने स्विमिंग खेळात सहभागी होत आपले नाव लौकिक केले. तिने फक्त पोहने न शिकता सातत्याने वेगवेगळ्या स्पर्धेत भाग घेऊन यश खेचून आणणे व मेडल्स मिळवणे आता अंजनाचा छंदच झाला आहे. अंजनाला स्विमिंग साठी मा.घनश्याम कुवर सर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. स्पर्धेत भाग घ्यायला प्रोसाहन देणे व त्यासाठी कसून नियमित सराव करून घेतल्यामुळे आणि सातत्य ठेवल्यामुळे अंजनाला स्विमिंग च्या स्पर्धेत यश मिळत गेले. आपल्या स्विमिंग कोच बद्दल कायम नतमस्तक होऊन म्हणते चांगले गुरुवर्य मिळणे हे माझं भाग्य आहे.अंजनाला सायली पोहरे,सुनील पोहरे,संगिता सुनील पोहरे, संदीप भानोसे, सागर बोडके, सक्षम संस्था, रॉयल रायडर्स ग्रुप,राणी खेडीकर, शिवुर्जा प्रतिष्ठान, दादासाहेब काळे,अभय पाटील,रमेश सुरशे, महेश साळुंके,पत्रकार लोखंडे सर, सुखदेव खुर्दळ,अर्चना पाटील, उज्ज्वला गुरुसूडकर, प्रहार संघटना, रवींद्र टिळे, संतोष मानकर यांचे मार्गदर्शन, व प्रोत्साहन व मदत लाभत असते.समाज,प्रसिद्धी माध्यम, सामाजिक संस्था,नातेवाईक, मित्रपरिवार,या सगळ्यांकडून अंजनाचे कौतुक होत आहे.

# टाकळखोपा गावच्या हद्दीतून अवैध वाळू वाहतूक करणारा टिप्पर पकडला

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :- पूर्णा नदीकाठच्या टाकळखोपा गावच्या हद्दीतून अवैधरीत्या दोन ब्रास वाळूची वाहतूक करणारा टिप्पर महसूल विभागाच्या पथकाने पकडला. ही कारवाई मंठा-लोणार महामार्गावर, पूर्णा पाठीजवळ, दिनांक २ मे रात्री साडेनऊ वाजता करण्यात आली. पकडण्यात आलेल्या टिप्परचा क्रमांक एमएच २८ बीबी ७४१२ असून, पुढील कारवाईसाठी सदर टिप्पर मंठा येथील महसूल गोदामात लावण्यात आला आहे. या कारवाईत ग्राम महसूल अधिकारी पी. एस. भालेराव, के. डी. इंगळे, परमेश्वर जंगले आणि आनंद पंचांगे यांनी सहभाग घेतला.



# ईएसआयसीच्या कार्यालयात येणा-जाणारे नागरिक घामाघूम, फॅन फक्त सुरक्षारक्षकासाठी

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल/ वार्ताहर
करंजाडे वसाहतीत ईएसआयसी (कर्मचारी राज्य विमा निगम) चे कार्यालय असून त्या ठिकाणी येणा-जाणारे नागरिक घामाघूम होताना दिसत आहेत. या ठिकाणी असणारा फॅन हा फक्त सुरक्षारक्षकासाठी ठेवण्यात आला आहे. फॅन नसल्याने नागरिकांना उन्हाच्या तडाख्यात या ठिकाणी घामाघुम व्हावे लागत आहे.

करंजाडे, सेक्टर 3 ए येथील इमारतीमध्ये ईएसआयसीचे कार्यालय आहे. या कार्यालयात अनेक ठिकाणचे कामगार आपल्या कुटुंबीयांच्या हॉस्पिटलच्या कामासाठी येजा असतात. मात्र अनेकदा नागरिकांना या ठिकाणी ताटकळत राहावे लागते. खाली असणाऱ्या रूममध्ये एक टेबल फॅन आहे. त्याचा वापर सुरक्षारक्षक करतो. त्यामुळे या ठिकाणी कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना पंख्याविना बसावे लागते. त्यामुळे ते घामाघुम होतात. या ठिकाणी वीस ते पंचवीस मिनिटाच्या कामासाठी एक ते दीड तास लागत असल्याच्या तक्रारी नागरिक करत आहेत. या कार्यालयाच्या वर असणाऱ्या फलकावरील अक्षरे गायब झाल्याने बाहेराहून येणाऱ्या नागरिकांना हे कार्यालय शोधावे लागते. त्यामुळे हा फलक नवीन लावला पाहिजे. येथील कार्यालय सकाळी नऊ वाजता उघडते. मात्र बुधवारी ३० एप्रिल रोजी सकाळी सव्वा दहा वाजता डॉक्टर आले. असा प्रकार रोजच सुरू असल्याचा नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे सकाळी आलेल्या नागरिकांना ताटकळत राहावे लागले. ईएसआयसीचे कार्यालय म्हणजे आओ जावो, घर तुम्हारा अशी परिस्थिती



झाली आहे. अनेकदा येथील कर्मचारी फोनवरच गप्पा मारताना दिसून येतात. येथे काम करणारे कर्मचारी, डॉक्टर चप्पल, बूट घालून आतमध्ये जातात. मात्र नागरिकांना चप्पल, बूट बाहेर काढण्यास सांगतात. याबाबत ईएसआयसीचा टोल फ्री क्रमांक 1800112526 यावर संपर्क साधला असता त्यांनी डॉक्टरांनी नऊ वाजता येणे बंधनकारक असल्याचे सांगितले.

# निफाड पंचायत समितीत भोंगळ कारभार अहवाल येण्यास 1 वर्ष एकमेका साह्य करू होऊ सर्व श्रीमंत

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी/ राजेश भडांगे

विंचूर :- विष्णूनगर ता. निफाड येथे क्रीडांगणाचे ( प्ले ग्राउंड ) किरकोळ काम करून 7 लाख रुपये चा अपहार झालेला असल्याचा अंदाज करून माहिती अधिकार अर्जानुसार गटविकास अधिकारी यांना अर्ज केलेला असता तब्बल दोन महिन्यानंतर क्रीडांगणाची पाहणीसाठी मुहूर्त ठरला 21/ 3/ 2024 रोजी त्यासाठी विस्तार अधिकारी राजेश थोरात व गौरवकुमार हिरे हे पाहणीसाठी आले व पाहणी झाल्यानंतर अहवाल 2 ते 3 दिवसात मिळेल असे सांगितले खरे
परंतु तब्बल 1 वर्ष होऊनही कुठलाही अहवाल आलेला नाही वारंवार कार्यालयाशी संपर्क साधला असतानाही विस्तार अधिकारी राजेश थोरात यांनी अहवाल देण्यास टाळाटाळ केलेली आहे अहवाल न देण्याचे नेमके कारण गुलदस्त्यात आहे क्रीडांगणाचे किरकोळ काम करून 7 लाख रुपये गेले कोणा कोणाच्या खिशात अशी ग्रामस्थांकडून प्रतिक्रिया येत आहे व अश्या अधिकाऱ्यांची चौकशी वरिष्ठ अधिकारी करतील का निफाड पंचायत समिती येथील गटविकास अधिकारी यांचा संबंधित अधिकाऱ्यावर कुठलाही प्रकारचा वचक नसल्याचा दर्शनास येत आहे आता 1 वर्षानंतर निफाड पंचायत समिती येथील गटविकास अधिकारी यांना आता तरी जाग येते का हे बघावे लागेल व ग्रामसेवक व विस्तार अधिकारी यांच्यावर कारवाई होईल का हे बघणेही तितकेच महत्त्वाचे आहे




आमच्या विष्णुनगर गावात
क्रीडांगणाचे 7 लाख व वॉल कंपाऊंड 7 लाख असे एकूण 14लाख रुपये आलेले होते परंतु किरकोळ कामे करून मोठा अपहार झाला आहे त्या वेळेस ग्रामसेवक सुनील शिंदे होते त्या वेळेतील लोकसेवक व ग्रामसेवक यांनी मिळून भ्रष्टाचार केल्याचा माझा दावा आहे

प्रतिक्रिया :- माजी सरपंच रामदास घायाळ

=======================================

# भांबेड गावातील श्री वाघजाई तरुण विकास मंडळ-नार्डेकरवाडी तर्फे श्री वाघजाई मंदिरच्या द्वितीय वर्धापनदिननिमित्त श्री सत्यनारायण महापुजेसह विविध कार्यक्रम चे आयोजन

दैनिक युवक आधार
मुंबई (शांताराम गुडेकर)

रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यामधील भांबेड गावातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या श्री वाघजाई तरुण विकास मंडळ-नार्डेकरवाडी(रजि.क्र.जी.बी.बी.एस.डी. ९७८)तर्फे श्री वाघजाई मंदिरच्या द्वितीय वर्धापनदिन आणि श्री. सत्यनारायण महापुजेचे आयोजन वैशाख शु.१४, रविवार दि.११ मे २०२५ रोजी मु.पो.भांबेड (नार्डेकरवाडी), ता.लांजा,जि. रत्नागिरी येथे आयोजन करण्यात आले आहे.यानिमित्ताने
कार्यक्रमाची रूपरेषा अशी आहे की,शुक्रवार दि.९ मे २०२५ रोजी रात्री ९ वाजता वाडी मर्यादित किर्केट चे सामने,शनिवार दि १० मे २०२५ रोजी दुपारी ३ वा.महिलांसाठी हळदी -कुंकू आणि रात्री ९ वा.लहान मुलांचे रेकॉर्ड डान्स / नाटक तर रविवार दि.११ मे २०२५ रोजी स. ५ ते ६ वा.काकड आरती,स.९ ते ११ वा. सत्यनारायण महापुजा,११ ते १२ वा. सार्वजनिक आरती,दु.१२ ते २ वा. महाप्रसाद (भंडारा),दु.३ ते ६ वा. सांस्कृतिक स्पर्धा,संध्या. ६ ते ७ वा. आरती,रात्री ७ ते ८ वा.सुसंगीत भजन,रात्री ९ ते १० वा.गुणगौरव व सत्कार समारंभ,रात्रौ १०.०० वा. लोकनाट्य बहुरंगी नमन-सोबा राघोबा राधाकृष्ण नमन मंडळ मोर्डे, गवळीवाडी वग नाट्य - राज गादिचा लालसा (सख्खा भाऊ पक्का वैरी)चे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रम साठी कोकण कन्या सृष्टी कुळये या उपस्थित रहाणार आहेत. केवळ जिद्द, चिकाटी आणि प्रचंड मेहनत या त्रिसूत्रीच्या जोरावर सृष्टी कुळये यांनी यूपीएससीमध्ये यश संपादन करत देशात ८३१ रँक मिळवली आहे.या सर्व कार्यक्रम साठी स्वागतोत्सुक म्हणून श्री. देवराम पांडुरंग नार्डेकर (वाडीप्रमुख),श्री. सुरेश मनोहर मोसमकर (अध्यक्ष),श्री.सुनिल शांताराम नार्डेकर (सचिव),श्री.योगेश उमाजी नार्डेकर (खजिनदार) आणि सर्व पदाधिकारी, सदस्य, वाडीतील सर्व महिला-पुरुष, युवक-युवती, आजी-माजी पदाधिकारी, सदस्य आणि सभासद तसेच किलबिल कंपनी सज्ज रहाणार आहे. तरी या संपूर्ण कार्यक्रमचा गावातील नागरिक, माहेरवाशिनी, पाहुणे मंडळी यांनी लाभ घ्यावा असे आग्रहाचे निमंत्रण श्री वाघजाई तरुण विकास मंडळ - नार्डेकरवाडी, समस्त मुंबई व ग्रामस्थ मंडळ यांनी केले आहे.सर्व सन्माननीय देणगीदार आणि हितचिंतक यांचे मंडळने आभार व्यक्त करत आहे. तरी सर्व भाविकांनी महाप्रसादाचा (भंडाऱ्याचा) लाभ घ्यावा असे आवाहन मंडळ तर्फे करण्यात आले आहे.



# पनवेल महानगरपालिका राज्यातून तिसऱ्या क्रमांकांनी विजेती

## राज्य शासनाचे 100 दिवसांचे कार्यालयीन सुधारणांचे विशेष अभियान

दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य शासनाने शंभर दिवसांची कार्यालयीन सुधारणा संदर्भात एक विशेष अभियान राबवले होते. यात राज्यातील महानगरपालिका गटामध्ये सहभाग नोंदवत पनवेल महानगरपालिकेने उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यात तिसरा क्रमांक मिळविला आहे. 1 मे महाराष्ट्र दिनी याबाबतचा निकाल जाहीर झाला आहे.

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा ने विविध पथदर्शी तसेच लोकाभिमुख उपक्रम राबविले आहेत. त्यामुळेच हे यश मिळाले.

या बद्दल बोलताना श्री. चितळे म्हणाले, पनवेल महानगरपालिकेच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कामाची दखल शासनाने घेतली आहे. यापुढे महानगरपालिकेच्या कामात अधिक सुधारणा घडवून पनवेल शहराचे नाव वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न महानगरपालिकेकडून होणारच आहे. महानगरपालिकेला मिळालेले कोणतेही यश,येथील नागरिकांचेच असते. या पारितोषिक बद्दल श्री. चितळे यांनी पनवेलच्या सर्व नागरिकांचे विशेष अभिनंदन केले, तसेच ज्या महानगरपालिकांना पारितोषिक मिळाले त्यांचेही अभिनंदन केले. भारतीय गुणवत्ता परिषदेतर्फे १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाचे अंतिम मूल्यमापन करण्यात आले होते. यामध्ये वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोयी-सुविधा, तक्रार निवारणा, सुलभ जीवनमान, गुंतवणूक चालना तसेच तंत्रज्ञानाचा वापर अशा विविध 17 मुद्द्यांवर गुणांकन करण्यात आले होते.यामध्ये सर्वोत्तम महापालिका आयुक्त विभागात पनवेल पालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी १०० पैकी ७९.४३ गुण प्राप्त करून सर्वोत्तम आयुक्तांच्या यादीत राज्यात पालिकेचा तिसरा क्रमांक आला आहे.

नागरिकांना लोकाभिमुख, पारदर्शी व उत्तरदायी प्रशासन देण्याच्या अनुषंगाने पनवेल पालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या १०० कार्यालयीन सुधारणा मोहिमेअंतर्गत पनवेल पालिकेने नागरिकांच्या तक्रारी त्वरित आणि योग्य पद्धतीने निवारण करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम सुरू केले आहेत. या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी महापालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. यापुढेही गतिमान प्रशासन करण्याच्या दृष्टीने अशाच प्रकारे सातत्य टिकविण्यासाठी महापालिका कटिबध्द राहिल. मंगेश चितळे,आयुक्त तथा प्रशासक, पनवेल महानगरपालिका

## संपादकीय

### मनोरंजनाच्या नावाखाली उल्लू चाळे!

निसर्गाने प्रत्येकच गोष्टीला मर्यादा घातली आहे. पशू-पक्षी, झाडे-वेली निसर्गाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करतातच; परंतु मनुष्य हा प्राणी मात्र नियमांचे उल्लंघन करतांना आढळतो. नियम अथवा मर्यादा उल्लंघनाचा परिणाम विनाशाकडे नेणारा असतो, हे बुद्धी असूनही मोहापायी मनुष्य मानत नाही. अलिकडे वेगवेळवी ॲप आणि ओटीटी चॅनलचा सुळसुळाट झाला आहे. यांना सेन्सॉर नाही. त्यामुळे काय दाखवायचे आणि काय नाही, याची कुठलीही मर्यादा नाही. उल्लू ॲपवरील हाउस अरेस्ट हा शो त्यातीलच एक प्रकार. सायबर पोलिसांनी आणि महिला आयोगाने त्याची गंभीर दखल घेत त्यावर बंदी घातली. तो रियालिटी शो आता थांबेलही, पण असे शेकडो प्रकार सध्या सोशल मिडिया आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली सुरू आहेत, त्यांचे काय? मनोरंजन म्हणून चालू झालेला एखादा खेळ जुगाराकडे वळला, तरी त्याकडे खेळ म्हणूनच पाहिले जाते आणि त्यातून होणारे गंभीर परिणाम रोखण्यासाठी कायदे करून बंधने घालावी लागतात. याचेच एक उदाहरण म्हणजे 'हाऊसी' हा खेळ ! प्रारंभी घरगुती असलेल्या या खेळात आता गोव्यात लाखो रुपयांची पारितोषिके कमावली जातात. 'हाऊसी', 'तंबोला' अथवा 'बिंगो' अशी नावे असलेला हा खेळ घरातून दारात, दारातून गावात आणि गावात त्याला मिळत असलेले मोठे स्वरूप पहाता त्याचे सामाजिक धोके सरकारला जाणवू लागले अन् सरतेशेवटी दक्षिण गोव्यात त्यावर बंदी घालण्यात आली. शहरांमध्येही गृहसंकुलांचे सार्वजनिक कार्यक्रम, महिलांच्या 'किटी पार्ट्या' यांमध्येही हा खेळ मोठ्या प्रमाणात खेळला जात आहे. मनोरंजनात्मक खेळाने मर्यादा ओलांडली की, त्याला कायद्याची वेसण घातली जाते; परंतु तरीही व्यसनाचा हा प्रकार या ना त्या मार्गाने डोके वर काढत असतोच. गोव्यात सार्वजनिक गणेशोत्सव काळात मंडळांकडून काढली जाणारी लॉटरी मिळण्यासाठी मुसळधार पावसात १-२ कि.मी.च्या रांगांमध्ये थांबणे असो वा राष्ट्रीय स्तरावरील 'आय.पी.एल.' क्रिकेट स्पर्धा असो. या प्रकारांत कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असते, ज्याची देवाण-घेवाण अथवा आर्थिक स्रोत नेहमीच पडद्यामागे असतो.

गोवा फूटबॉल संघटनेने सरकारने 'हाऊसी'वर घातलेल्या बंदीला विरोध करत 'हाऊसी' हा ग्रामीण भागातील क्लब्ससाठी एक पारंपरिक महसूल स्रोत असल्याचे सांगितले. 'हाऊसी' कार्यक्रमांमधून मिळणार्या पैशांचा वापर 'फूटबॉल क्लब्स' फूटबॉल विकासासाठी आणि सामाजिक उपक्रमांसाठी वापरत असल्याचेही सांगितले. 'गोव्यात कॅसिनोंना अनुमती असतांना 'हाऊसी' या साध्याशा खेळावर बंदी का ?', या प्रश्नाचे उत्तर सरकार आणि प्रशासन हेच देऊ शकतात. काळानुसार जुगाराची संकल्पना अधिक विकसित होत आहे. सद्यःस्थितीत 'क्रीडा सट्टेबाजी' आणि 'ऑनलाईन गेम' यांच्या लोकप्रियतेमुळे भारतात जुगाराला व्यापक अधिकृत रूप प्राप्त झाले आहे. 'आता आहे त्यापेक्षा अधिक काय वाईट होणार ?', या विचाराने अनेक जण जुगाराच्या या प्रकरणांना भुलतात. जुगार हा काही झटपट श्रीमंत होण्याचा मार्ग नाही. जुगारात जिंकण्याची सर्वाधिक शक्यता किंवा हमी केवळ खेळाच्या आयोजकांची असते, हे लक्षात घ्यायला हवे. जुगाराला आळा घालण्यासाठी भारतात विविध कायदे करण्यात आले; मात्र जुगाराला कायद्याने नियंत्रित करणे शक्य झालेले नाही, तरी तो नियंत्रित करणे आवश्यक आहे, तसेच त्यावर पूर्णतः बंदी घालण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती आणि प्रशासनाकडून कायद्याची प्रभावी कार्यवाही हवी. कोणत्याही गोष्टीत कौशल्य असणे आणि त्यावर पैसे लावणे या दोन्ही गोष्टी वेगळ्या आहेत. ज्याप्रमाणे क्रिकेट खेळामध्ये जिंकणारा संघ हा खेळातील कौशल्यामुळे जिंकतो; परंतु पैसे लावून जेव्हा कोणत्या खेळाडूचा खेळ आधीच नियंत्रित केला जातो तेव्हा त्यावर लावलेला सट्टा हा जुगार आहे. एकीकडे 'आय.पी.एल.'च्या सामन्यांमधून सट्टेबाज लाखो रुपये कमावतात, तर दुसरीकडे श्रम करणार्यांच्या खिशात कष्टाचे पैसे येतांनाही मारामार होते. 'हाऊसी' या खेळात सर्व वयोगटांना सहभागी होता येते.

## नागोठणे स्थानकात प्रवासी ओलांडतात रेल्वे रूळ ; अपघात झाल्यास जबाबदार कोण?

### स्थानकाच्या शेवटच्या टोकाला एकच रेल्वे ब्रिज ; नवीन ब्रिजची मागणी

दैनिक युवक आधार
नागोठणे : वार्ताहर
दि. 14 एप्रिल 2025 – येथील रेल्वे स्थानकात फलाट क्र. 2 व 3 कडे जाण्याकरीता स्थानकाच्या शेवटच्या टोकाला एकच ब्रिज असल्याने तेथून येणारे प्रवासी जवळचा मार्ग म्हणून रेल्वे रूळ ओलांडून येत असतात. ते येत असताना समोरून एखादी गाडी येऊन अपघात झाल्यास त्याला जबाबदार कोण ??? असा प्रश्न उपस्थित होत असून स्थानकाच्या पुढील बाजूस व मध्यभागी ब्रिज टाकण्याची मागणी प्रवासी वर्ग करीत आहे. नागोठणे रेल्वे स्थानक हे मध्यवर्ती व महत्वाचे ठिकाण असून या ठिकाणाहून पाली,खांब-कोलाड,शिहू-बेणसे तसेच नागोठणे शहरासह विभागातील खेडेगावातील जनता दररोज पनवेल- मुंबईकडे नोकरी,उद्योगधंदे तसेच इतर काम धंद्यासाठी प्रवास करीत असतात. यामध्ये परिसरात असलेल्या जिंदाल, सुप्रीम, रिलायन्स सारख्या मोठ-मोठ्या कंपनीच्या कामगारांचाही समावेश आहे. रेल्वेने आरामदायी तसेच कमी पैशात सुरक्षित प्रवास होत असल्यामुळे येथून रेल्वेने दररोज हजारो प्रवाशी प्रवास करीत असतात.त्यामध्ये महिला व जेष्ठ नागरिकांचाही समावेश आहे. परंतु हे स्थानक प्रवाशांसाठी असुरक्षित असल्याकारणाने प्रवाशांना आपला जीव मुठीत घेवून नेहमीच प्रवास करावा लागत आहे. स्थानकाचा प्रवेशव्दार फलाट क्रं.1 च्या पुढील बाजूस असून स्थानकातून मुंबईकडे जाणारी गाडी ही स्थानकाच्या फलाट क्रमांक 1 येते. मुंबईकडून येणारी गाडी ही स्थानकाच्या पलीकडे फलाट क्रमांक 2 किवा 3 वर येते. तेथे उतरणारे प्रवाशांना स्थानकाच्या बाहेर पाडण्यासाठी स्थानकाच्या मागील बाजूला शेवटच्या टोकाला एकच ब्रिज आहे व तो खूप लांब असल्याने बहुतेक 95% प्रवाशी हे रेल्वे रूळ ओलांडून स्थानकाच्या बाहेर पडतात. हे जरी बेकायदेशीर असले तरीही एका ब्रिजवरुन सर्व प्रवाशांना सामानासहीत मागे जावून पुन्हा पुढे येणे शक्य होत नाही. कारण सकाळी 10.39 वा.ची दिवा-रोहा,सायंकाळी 07.43 वा.ची दिवा-रत्नागिरी व रात्रीची 08.54 व 09.59 ची दिवा-रोहा या गाडीमधून बरेच प्रवाशी नागोठणे येथे उतरतात. प्रवाशी रेल्वे रूळ ओलांडत असताना एखादी एक्स्प्रेस किंवा मालगाडी आली तर मोठा अनर्थ होऊ शकतो. सदरील वेळी अपघात झाला तर त्याला जबाबदार कोण ??? असा प्रश्न उपस्थित होत असून रेल्वे प्रशासनाने सदरील धोका टाळण्यासाठी स्थानकाच्या पुढील बाजूस व मध्यभागी असे आणखी दोन ब्रिज टाकण्याची मागणी नागोठणे प्रवासी संघटनेसह प्रवासी वर्ग करीत आहेत. सकाळच्या दिवा – रोहा गाडीतील प्रवाशांना मोठा धोका – नागोठणे स्थानकात सकाळची 10.39 वा.ची दिवा-रोहा ही गाडी उशिरा 11.15 वा दरम्यान क्रं.02 किंवा 03 वर आले व त्यातील प्रवाशी आपल्या सामानासहीत रेल्वे रूळ ओलांडून फलाट क्रं.01 वर येत असतील व त्याच दरम्यान 11.15 वा. फलाट क्रं.01 वर येणारी रत्नागिरी दिवा ही गाडी वेळेत स्थानकात येत असेल व रूळावरून फलाटावर चढणाऱ्या प्रवाशांचे गाडीकडे लक्ष नसल्यास मोठा अनर्थ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## शिरपूर शहरासह ग्रामीण भागात सुद्धा अवैध दारू व गुटखा विक्री जोरात

दैनिक युवक आधार
उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम / गजानन पवार.
मालेगाव तालुक्यातील शिरपूर शहर व ग्रामीण भागामध्ये मागील काही दिवसापासून येथे खुलेआम प्रतिबंधित गुटखा आणि देशी दारूची विक्री होत असल्याची तक्रार ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. तसेच शिरपूर शहर सर्वच बाबतीत अव्वल आहे. तसेच दोन नंबरच्या धंद्यातही युवक व्यसनाधीकडे वळत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. संभाव्य अनुचित घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी यावर नियंत्रण मिळवण्याची मागणी करण्यात आली आहे. शिरपूर ही मालेगाव तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ आहे. या ठिकाणी परिसरातील 40. ते 45. खेडेगावातील लोक विविध कामासाठी दर दिवशी येत असतात. त्यामुळे या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने पोलिसांसह सर्व संबंधित यंत्रणांकडून योग्य उपाय योजना होणे आवश्यक आहे. तथापि या ठिकाणी अवैध दारू विक्री सह प्रतिबंधित गुटख्याची खुलेआम विक्री होत असल्याची सामान्य जनतेत खमंग चर्चा आहे. अवैध दारू विक्रीमुळे परिसरातील अनेकांचे संसार ही उध्वस्त झाले असून अनेकांचे संसार उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. ही बाब लक्षात घेत पोलीस प्रशासनासह अन्न व औषधी प्रशासनाकडून या शिरपूर शहरांमध्ये व ग्रामीण भागामध्ये ठिकठिकाणी कारवाईची मोहीम राबविणे आवश्यक झाले आहे.



**ठाणेदार वाघ सुस्त नाही घालत गस्त. अवैध धंदे मस्त ! कर्मचारी वसुलीत व्यस्त. शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत देशी व विदेशी दारू व गुटख्याचा महापूर.!!**

===============

## पहलगाममधील अतिरेकी हल्ल्यामध्ये जखमी झालेले सुबोध पाटील घरी परतले सुखरुप

दैनिक युवक धन्यवाद
पनवेल, (वार्ताहर) जम्मू काश्मीर येथील पहलगाममध्ये दहशतवाद्यांच्या गोळीबारात जखमी झालेले पनवेल तालुक्यातील कामोठे येथील रॉयल हेरिटेज अपार्टमेंट मधील सुबोध पाटील सपत्नीक सुखरुप घरी परत आले आहेत. त्यावेळी त्यांच्या सोसायटीमधील नागरिकांनी जल्लोषात त्यांचे स्वागत केले.
पहलगाम हल्ल्यातून थोडक्यात बचावलेले सुबोध पाटील सुखरूपपणे आपल्या कामोठे येथील निवासस्थानी परतले. पहलगाम येथील हल्ल्याबाबत सुबोध पाटील यांनी अतिशय थरारक असा अनुभव कथन केला. सुबोध पाटील यांनी सांगितले की, मागून कसला तरी आवाज येत होता. परंतु, नेमके काय सुरू आहे, ते कळत नव्हते. तो आवाज सलगपणे सुरूच होता आणि तेथे उपस्थित असलेले लोक सैरावैरा पळत होते. आम्हीही अत्यंत घाबरलो आणि वाट मिळेल, तिथे पळू लागलो. काही अंतर गेल्यावर समोरच काही लोक बसलेले दिसले. त्यामुळे आम्हीही तिथे बसलो. तेवढ्यात एक दहशतवादी तेथे आला आणि म्हणाला की, तुमच्यापैकी जे हिंदू आहेत, त्यांनी उभे राहा. असे सांगताच त्याने गोळ्या झाडायला सुरुवात केली. त्यातील गोळ्या मला लागून मी खाली पडलो. अनेक तासांनी शुद्ध आली, तेव्हा माझ्या आजूबाजूला मृतदेह पडलेले पाहिले. ज्या स्थानिकाने मला त्या बैसरन खोऱ्यात नेले होते, त्याने मला ओळखले. त्याने मला प्यायला पाणी दिले आणि पाठीवर घेऊन मला तिथून बाहेर काढले. तेथून बाइकवरून खाली घेऊन आला. लष्कराच्या जवानांनी माझ्यावर प्राथमिक उपचार केले आणि रुग्णालयात दाखल केले. तिथून मला हेलिकॉप्टरने लष्करी रुग्णालयात नेण्यात आले. तिथे सात दिवस माझ्यावर उपचार सुरू होते, असे सुबोध पाटील यांनी सांगितले.



## मान्सून पूर्वतयारी व आपत्ती व्यवस्थापन कामाचा आयुक्तांनी घेतला आढावा

दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी
पावसाळी कालावधीत आपत्ती ओढावू नये यासाठी महानगरपालिका व इतर विविध विभागाच्यावतीने सुरू असलेल्या मान्सुन पूर्व कामांचा आढावा दिनांक 2 मे रोजी मुख्यालयात घेतलेल्या बैठकितआयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी घेतला. यावेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, सहाय्यक संचालक नगररचना अधिकारी केशव शिंदे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक पोलिस आयुक्त अशोक राजपूत, उपअभियंता विलास चव्हाण, चारही विभागचे विभाग प्रमुख ,वृक्ष प्राधिकरण विभाग प्रमुख संदिप पवार, पालिका अधिकारी, सिडको अधिकारी, आयआरबी प्रतिनिधी, उपस्थित होते. धोकादायक इमारती निष्कांसित करण्यासाठी पनवेल महापालिकेस पोलिस विभागाने सहकार्य करण्याबाबत यावेळी आयुक्तांनी सहाय्यक पोलिस आयुक्त अशोक राजपूत यांना सांगितले. तसेच पावसाळ्यात पांडवकडा भागात पोलिस बंदोबस्त करण्याबाबत करण्याविषयी आयुक्तांनी पोलिस विभागास सांगितले. पावसाळ्यात अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवरती एसटीपी प्लॅन्टमधील पंप सुरू ठेवावेत, त्यांची दुरूस्ती करून ठेवण्याबाबत आयुक्तांनी सिडको अधिकाऱ्यांना सूचित केले. याचबरोबर बस स्टॅन्डसमोरील हायवेवरील रस्त्यावर पडणारे पाण्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व आयआरबी यांना आयुक्तांनी सूचित केले. याचप्रमाणे रस्त्यांकडील होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडीट करून महापालिस कळविण्यासंबधितआयुक्तांनी सूचना दिल्या. पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळा नादुरूस्त शाळा पावसाळयापूर्वी दुरूस्त करून घेण्याबाबत आयुक्तांनी सांगितले. पावसाळ्यापूर्वी पालिका कार्यक्षेत्रातील रस्ते दुरूस्तीची कामे पूर्ण करण्याबाबत मनपाच्या बांधकाम विभागास आयुक्तांनी सूचित केले. महापालिका कार्यक्षेत्रातील आत्तापर्यंत झालेल्या नालेसफाईच्या कामाचा आढावा घेऊन उर्वरीत लहान मोठ्या सर्व नालेसफाईची कामे 20 मेपर्यंत पुर्ण करण्याबाबत आयुक्तांनी आरोग्य विभागास सूचना दिल्या. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवरती साथरोगासारखे विकार उद्भवल्यास तयारीच्या दृष्टीने औषधसाठा व इतर वैद्यकिय सेवासुविधांची पुर्तता करण्याबाबत वैद्यकिय आरोग्य विभागास आयुक्तांनी सांगितले. धोकादायक झाडे तोडणे, धोकादायक फांद्या तोडण्याचे काम विद्युत विभागासोबत समन्वय साधून करण्याबाबत आयुक्तांनी सांगितल.

## पनवेल महापालिकेच्या वतीने "मिशन रेबिस"संस्थेच्या सहकार्याने अग्निशमन कर्मचाऱ्यांसाठी पशु-पक्षी बचाव प्रशिक्षण

दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी
पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार मनपाच्या पशुवैद्यकीय विभागाच्यावतीने अग्निशमन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी दोन दिवसीय पशु-पक्षी बचाव प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली.
"मिशन रेबिस" संस्थेच्या सहकार्याने २८ व २९ एप्रिल रोजी आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात हे प्रशिक्षण घेण्यात आले.

शहरातील विविध ठिकाणी अडकलेले, अपघातग्रस्त किंवा नाल्यात अडकलेले प्राणी व पक्षी वाचवताना अग्निशमन कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. ही गरज लक्षात घेऊन प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची फळी तयार करण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला.
झीरो रेबीज निर्मुलन कार्यक्रम अंतर्गत अग्निशमन कर्मचाऱ्यांना हे प्रशिक्षण देण्यात आले. दोन दिवस घेण्यात आलेल्या या प्रशिक्षणात मिशन रेबीजचे डॉ. शशिकांत जाधव आणि डॉ. आश्विन सुशीलन यांनी सहभागी कर्मचाऱ्यांना प्राणी बचावाच्या सुरक्षित पद्धती, प्राणीवर्तनाचे निरीक्षण, प्राणीजन्य आजार आणि रेबीजवरील प्रतिबंधात्मक उपाय यांची माहिती दिली. अशा प्रशिक्षणामुळे आपत्कालीन परिस्थितीत प्राण्यांचे सुरक्षित रेस्क्यू अधिक परिणामकारक ठरणार आहे, असा विश्वास यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. उपायुक्त डॉ. वैभव विधाते व मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या सूचनेनुसार या कार्यक्रमाचे आयोजन सहायक आयुक्त डॉ.रूपाली माने, डॉ. बी. एन. गीते व डॉ. मधुलिका पी. लाड यांनी केले.



दैनिक युवक आधार (RNI NO :-MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.


daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

दखल

# येरोळ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

दैनिक युवक आधार
प्रशांत तांबोळकर लातुर
शिरूरआनंतपाळ

: तालुक्यातील येरोळ येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.
येथील आंबेडकर नगर येथील बुध्दविहार मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन गावातील मुख्य




रस्त्यावरुन जय संविधान जय भीमराय च्या जय घोषणा देत शांतेत मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये येरोळ व पंचक्रोशीतील आंबेडकर विचार प्रेमी नागरिक उपस्थित होते. यावेळी मिरवणुकीनंतर भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.
यावेळी जयंती समितीचे अध्यक्ष सचिन कांबळे, प्रकाश बनसोडे, हानमंत बनसोडे, महेश शिंदे, हरिष बनसोडे यांच्यासह समाजातील तरुणांनी सहभाग नोंदविला. तर अनुचित प्रकार होऊ नये म्हणुन पलीस निरिक्षक विठ्ठल दराडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# नैनाक्षेत्रातील नगररचना परियोजना क्रमांक ८, ९, १०,११ व १२ ची लवाद सुनावणी अंतिम टप्प्यात,

### भूधारकांना संपर्क साधण्याचे सिडकोचे आवाहन

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

शासनाने १० जानेवारी २०१३ रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोची नियुक्ति केली आहे. त्या अंतर्गत विकास आराखडयामध्ये नगररचना परियोजनेद्वारे नियोजित आणि शाश्वत शहरी विकासाला चालना देण्यासाठी आदेश देण्यात आले. नैना क्षेत्राचा नियोजित आणि सुव्यवस्थित विकास हा महाराष्ट्राच्या प्रगत आणि समृद्ध नागरीकरणासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.
सध्या नैना क्षेत्रात १२ नगररचना परियोजना प्रस्तावित असून, त्यापैकी परियोजना क्रमांक १ आणि २ या अंतिम मंजुरी प्राप्त झालेल्या आहेत, तर परियोजना क्रमांक ३ ते ७ यांना प्राथमिक मान्यता मिळाली आहे. नगररचना परियोजना क्रमांक ८, ९, १०, ११ आणि १२ यांसाठी लवाद सुनावणीस डिसेंबर २०२४ पासून सुरुवात झाली असून आता अंतिम टप्यात पोचलेली आहे.
या सुनावणी प्रक्रियेमध्ये ज्या जमीनमालकांची हजर राहण्यासंबंधीची नोटीस प्राप्त झाली नाही, किंवा अन्य कारणास्तव सुनावणी झाली नाही, त्यांचेकरीता ३० मे २०२५ पर्यंत सुनावणी देण्यास सिडको तर्फे मुदतवाढ देण्यात येत आहे.
नगररचना परियोजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आणि जमीनमालकांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी सिडकोकडून व्यापक जनजागृती मोहीम राबवली जात आहे. तरी अशा जमीनधारकांनी कार्यालयीन वेळेत म्हणजे सकाळी ११ ते संध्याकाळी ५ पर्यंत नैना कार्यालय, टॉवर नंबर १०, सिबीडी – बेलापुर रेल्वे स्थानक संकुल, ७ वा मजला, सीबीडी– बेलापूर, नवी मुंबई येथे आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे असे सिडको तर्फे सुचित करण्यात येत आहे.

# हुक्का पार्लरवर धाड, सहा जणांवर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
: खारघर पोलिसांनी हुक्का पार्लरवर धाड टाकून कारवाई केली असून सदर ठिकाणी शासन बंदी असलेला हुक्का सर्रास वापरला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची कारवाई गुरुवारी करण्यात आली.
खारघर पोलीस ठाणे हद्दीत सेक्टर १०, कोपरा गावालगत असलेल्या ब्लॅक फॉरेस्ट हुक्का पार्लर आहे. या ठिकाणी महाराष्ट्र राज्य प्रतिबंधित असलेले तंबाखू जन्य पदार्थ वापरून हुक्का ओढला जात असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सुर्वे यांनी एक बनावट ग्राहक पाठवून खात्री करून घेतली. मिळालेली माहिती सत्य असल्याची खात्री पटताच या हुक्का पार्लरमध्ये गुरुवार सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पो. निरी. प्रदीप आव्हाड, सहा. पो. उप. निरी. फिरोज आगा, पो हवा. सचिन गोसावी, अविनाश गायकवाड, राहुल डावरे पथक पाठवून कारवाई केली. यावेळी वेगवेगळ्या पद्धतीचे सुगंधित तंबाखूचे डबे, आणि हुक्का पॉट, पाईप्स अन्य सामान असे आढळून आले. १ लाख ५५ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी व्यवस्थापक रोहित राजपूत, बुटासिंग जसपाल सिंग सह इतर चार जणांविरोधात विरोधात कारवाई करून सहा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# सिल्लोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदी विश्वास दाभाडे तर उपसभापती पदी संदीप राऊत यांची बिनविरोध निवड

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :– योगेश पालोदकर
सिल्लोड :– सिल्लोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदी विश्वास दाभाडे तर उपसभापती पदी संदीप राऊत यांची बिनविरोध निवड झाली. सभापती, उपसभापती पदाची घोषणा होताच शिवसेना पदाधिकारी कार्यकर्त्यांनी बाजार समितीच्या आवारात एकच जल्लोष केला. नवनिर्वाचित सभापती विश्वास दाभाडे तसेच उपसभापती संदीप राऊत यांचा माजीमंत्री आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. शहरातील सेना भवन येथे हा सत्कार सोहळा पार पडला.
सभापती पदासाठी विश्वास दाभाडे यांचा तर उपसभापती पदासाठी संदीप राऊत यांचा एकमेव अर्ज आल्याने पीठासीन अधिकारी तथा सहाय्यक निबंधक संजय गाजूलवाड यांनी दाभाडे व राऊत यांना सभापती – उपसभापती पदी निवड झाल्याचे घोषित केले. त्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव विश्वास पाटील तसेच सहाय्यक निबंधक कार्यालयातील मुख्य लिपिक पांडुरंग काचोळे यांनी सहकार्य केले. विश्वास दाभाडे यांना सभापती पदासाठी संचालक केशवराव तायडे यांनी सूचक तर नंदकिशोर सहारे यांनी अनुमोदन दिले. तसेच संदीप राऊत यांना उपसभापती पदासाठी दामोधर गव्हाणे यांनी सूचक तर सतीश ताठे यांनी अनुमोदन दिले.
कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक




मंडळाच्या पदाच्या निवडी संदर्भात दि.28 जानेवारी 2024 रोजी निवडणूक पार पडली होती. या निवडणुकीत आ.अब्दुल सत्तार यांच्या जय श्रीराम सहकार विकास पॅनलचे 18 पैकी 18 संचालक निवडणूक आले होते. दिनांक 25 फेब्रुवारी 2024 रोजी केशवराव पा. तायडे यांची सभापती पदी तर दारासिंग चव्हाण यांची उपसभापती पदी निवड झाली होती. आ. अब्दुल सत्तार यांनी ठरवून दिलेल्या फार्मूला नुसार दिनांक 17 मार्च 2025 रोजी केशवराव तायडे व दारासिंग चव्हाण यांनी सभापती, उपसभापती पदाचा राजीनामा दिला होता. त्याअनुषंगाने आज सभापती व उपसभापती पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली.
यावेळी आ. अब्दुल सत्तार यांनी नवनिर्वाचित सभापती व उपसभापती यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी त्यांनी उपस्थित सर्व संचालक मंडळाला मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून बाजार समितीच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने समनव्यातुन काम करावे असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले. सभापती , उपसभापती पदासाठी एक वर्षाचा फार्मूला ठरविण्यात आला यामुळे 5 वर्षात 10 जणांना सभापती, उपसभापती पदावर काम करण्यासाठी संधी मिळेल.सिल्लोड तालुक्यातील आमठाणा आणि सोयगाव तालुक्यातील घानेगाव येथे उपबाजार सुरू करण्यासाठी आवश्यक कारवाई करा. बाजार समितीच्या आवारात पायाभूत – मूलभूत सुविधांची कामे करण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी दिलीयाप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर, माजी सभापती केशवराव पा. तायडे, रामदास पालोदकर, श्रीराम पा. महाजन, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, प्रभाकर काळे, देविदास पा. लोखंडे, सुदर्शन अग्रवाल, तालुकाप्रमुख मारोती पा. वराडे, शहरप्रमुख मनोज झंवर, शिवसेना महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार , कृउबा समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, श्रीरंग पा. साळवे, दारासिंग चव्हाण, दामूअण्णा गव्हाणे, बंडू पा. शिंदे, जयराम चिंचपुरे, सुनील पाटणी, अनुसयाबाई कौतीकराव मोरे, शालिनी नानासाहेब रहाटे, सतीश ताठे, राजाराम पाडळे, रमेश लाठी, भावराव लोखंडे, शेख जावेद यांच्यासह विठ्ठल सपकाळ, राजेंद्र ठोंबरे, संजय डमाळे, सुधाकर पाटील, शेख सलीम हुसेन, रउफ बागवान, प्रशांत क्षीरसागर, कौतीकराव मोरे, राजू गौर, रमेश साळवे, राजूबाबा काळे, नरसिंग चव्हाण, नासेर पठाण, विशाल जाधव, दुर्गेश जैस्वाल, पप्पू जगनाडे, हनिफ मुलतानी, हाजी मोहंमद हनिफ, विश्वास जंजाळ, दिलीप जाधव, पांडुरंग दुधे, सुमनबाई तांगडे, शांताबाई कावले, नाना पांढरे, आशिष कटारिया, ज्ञानेश्वर जाधव आदिंसह शिवसेनेचे पदाधिकारी – कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राळेगाव डॉक्टर असोसिएशन चा अध्यक्ष पदी डॉ सोमनाथ भोयर तर सचिव पदी डॉ राहुल पालकर याची निवड

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:–जितेंद्र खोडे
राळेगाव:– दिनांक 29/04/2025 रोजी हॉटेल गॅलेक्सी राळेगाव येते बैठक पार पडलेला डॉक्टर असोसिएशन मिटिंग मध्ये सर्वानुमते अध्यक्ष पदी डॉ.सोमनाथ भोयर तर उपाध्यक्ष डॉ.मनोज पांगुल सचिव पदी डॉ.राहुल पालकर तर मुख्य सल्लागार म्हणून डॉ.ओमप्रकाश फुलमाळी आणि डॉ.कुणाल भोयर याची निवड करण्यात आली तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी उपस्थित डॉ.अशोक थोडगे डॉ.अश्विनी थोडगे डॉ.पोटदुखे मॅडम डॉ.श्रीकांत उजवणे डॉ.पुरुषोत्तम उगेमुगे डॉ.चंद्रशेखर उजवणे डॉ.प्रतीक पांडे डॉ.सागर कुळसंगे डॉ.निलेश शेंडे डॉ.अमोल खडसे डॉ.हेमंत गलाट इत्यादी उपस्थित होते



# पनवेल शहर पोलिसांच्या पायी गस्त धडाक्यामुळे गुन्हेगारीला आळा

दैनिक युवक आधार
पनवेल, वार्ताहर : गेल्या 8 दिवसापासून पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या मार्फत हद्दीच्या वेगवेगळ्या ठिकाणी पायी गस्त मोहिम राबविण्यात येत असल्याने गुन्हेगारांमध्ये चांगलीच धडकी बसली आहे.
पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली वडघर फाटा ते काळीवाडा, मुसलमान नाका, टपाल नाका, पंचरत्न चौक, सिंधी हॉल, प्रशांत लॉज, गांधी हॉस्पीटल, आमदार निवास, मिडलक्लास सोसायटी, पुरोहित सोसायटी, एसबीआय बँक, बीजेपी कार्यालय, कर्नाळा भाजी मार्केट, जव्हेरी बाजार, जयभारत नाका, लाईन आळी, दि.बा.पाटील शाळा, सावरकर चौक, टिळक रोड, उपजिल्हा रूग्णालय, परदेशी आळी, सावरकर चौक, वडाळे तलाव, अशोक बाग, प्राचीन हॉस्पीटल, प्रांत ऑफीस कडून पनवेल शहर पोलीस ठाणे अशी पायी गस्त करण्यात आली. या पायी गस्त करिता 1 वपोनी, 1 पोनी, 5 सपोनी/पोउपनि तसेच 19 अंमलदार हजर होते. यावेळी बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. तसेच वडाळे तलाव परिसरात दुचाकी तसेच चारचाकी वाहने वेगाने चालविणे, वाहतूक कोंडी करणे आदींवर सुद्धा कारवाई करण्यात आली. तसेच ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग यांना मार्गदर्शन सुद्धा यावेळी करण्यात आले. या उपक्रमाचे पनवेलकरांनी कौतुक केले आहे.



# अत्याधुनिक चित्रपट, दूरदर्शन आणि मीडिया कॅम्पसच्या विकासासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी) गोदरेज फंड मॅनेजमेंटने व्हेवज समिट २०२५ मध्ये महाराष्ट्र शासनासोबत एक सामंजस्य करार केला. या धोरणात्मक भागीदारीचा उद्देश जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान, सुरक्षितता आणि शाश्वततेच्या मानकांनुसार अत्याधुनिक चित्रपट आणि मीडियाकॅम्पस विकसीत करून महाराष्ट्रात कला, माध्यम आणि दूरचित्रवाणी क्षेत्राच्या वाढीस चालना देणे हा आहे. या सामंजस्य कराराअंतर्गत, महाराष्ट्र शासन गोदरेज फंड मॅनेजमेंट ॲण्डइन्व्हेस्टमेंटॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेडला कॅम्पसविकासासाठी राज्य शासनाच्या विद्यमान धोरणे, नियम आणि कायद्यांनुसारसंबंधित राज्य विभागांकडून आवश्यक परवानग्या, नोंदणी, मान्यता आणि वित्तीय सवलती मिळवण्यासाठी सहाय्य करेल. गोदरेज सिटी, पनवेल या एकात्मिक गोल्फ टाउनशिपमध्ये असलेल्या या कॅम्पसमध्ये स्टुडिओज असतील. अत्याधुनिक सोयीसुविधा व जागतिक दर्जाच्या निर्मिती सुविधा पुरवत हे कलाकार, संगीतकार आणि चित्रपट निर्मात्यांसाठीमहत्वाचेकेंद्र ठरेल. या केंद्राच्या डिझाइनसाठी आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात आली असून ते नवीनतम तंत्रज्ञान, AI यांसारख्या प्रणालींनी सुसज्जआहे. कुशल मनुष्यबळासह जगातील सर्वात मोठा आशय निर्मिती देश म्हणून भारताला या स्टुडिओद्वारे स्थानिक प्रतिभेचा उपयोग करून कथाकथनातीलउत्कृष्टतेकडे वाटचाल करता येईल.या सुविधेमुळे आशय निर्मिती, हॉस्पिटॅलिटी आणि तांत्रिक सेवा क्षेत्रांमध्ये

**जागतिक स्तरावर मनोरंजन क्षेत्रात 'एआय'चा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. येत्या काळात नवी मुंबई येथे 'एआय' तंत्रज्ञानची शिक्षणनगरी उभारण्यात येणार आहे. तर पनवेल येथे चित्रपट सृष्टी उभारण्यात येणार असून यासाठी गोदरेज सोबतही दोन हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.**

रोजगारनिर्मिती होऊन लक्षणीय आर्थिक प्रभाव निर्माण होण्याची अपेक्षा आहे. तसेच पर्यटन आणि परकीय चलन यांना चालना मिळेल. यामुळे भारत सरकारच्या परदेशी चित्रपट निर्मितीसाठीच्या प्रागतिक प्रोत्साहन धोरणाचा लाभ घेता येईल.
या विकासामुळे पूरक उद्योगांनाही चालना मिळेल आणि पनवेल हे सर्जनशील उद्योजकता आणि नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी एक सक्षम केंद्र म्हणून उदयास येईल. हे विकासकार्य मुंबई ३.० या पुढारलेल्या नागरीकरण आणि शाश्वत विकासाच्या दृष्टिकोनाशी पूर्णपणे सुसंगत आहे आणि राज्यभर आर्थिक विकासाला गती देण्याच्या दिशेने आहे.




गोदरेज फंड मॅनेजमेंटचेव्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी करण बोलारिया म्हणाले, “हा उपक्रम म्हणजे नवकल्पना, सर्जनशीलता आणि रोजगारास चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनासोबतची एक अर्थपूर्ण भागीदारी आहे. मुंबई ३.० च्या दृष्टीकोनाशी सुसंगत जागतिक प्रतिभेला आकर्षित करणारी, स्थानिक सर्जनशील लोकांना सक्षम करणारी आणि पनवेलला सांस्कृतिक आणि व्यावसायिक केंद्र बनवणारीएक गतिशील परिसंस्था उभारण्याचा आमचा उद्देश आहे.” गोदरेज सिटी, पनवेल ही १४५ एकरमध्ये पसरलेली एक स्वयंपुरकगोल्फटाउनशिपअसून तिथे ३० एकरच्या९–होलगोल्फकोर्सचा समावेश आहे. या विकास प्रकल्पात नामांकित शाळा, आरोग्य सेवा, व्यावसायिक क्षेत्र आणि लोकप्रिय खाद्यपदार्थांच्या आउटलेट्सचा समावेश आहे. ही जागा दळणवळणाच्या सोई सुविधा यांच्या अनुषंगाने अत्यंत अनुकूल असून आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मुंबई–पुणे एक्सप्रेसवेपासून केवळ काही मिनिटांच्या अंतरावर आहे. अटलसेतू (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक) यामुळे दक्षिण मुंबईपर्यंतचा प्रवासाचा कालावधी आणखी कमी होतो. निसर्गसौंदर्य आणि शहरी पायाभूत सुविधांचा परिपूर्ण संगम असल्याने ही जागा चित्रपट, संगीत व्हिडिओ आणि विविध व्यावसायिक निर्मितींसाठी आदर्श स्थळ आहे.




माणगाव तालुका प्रतिनिधी संदेश बांदल दैनिक युवक आधार उतेखोल वाडी मित्र मंडळ वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना (छाया दैनिक युवक आधार)

दखल

## गावदेवी प्रिमियर लीग क्रिकेट सामन्याचे जल्लोषात उद्‌घाटन

दैनिक युवक आधार
पनवेल, दि.3 (वार्ताहर)

शहरातील गावदेवी पाडा येथे अंडर आर्म बॉक्स क्रिकेट ची गावदेवी प्रिमीयर लीग स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्‌घाटन संदिप पाटील, संजय मुरकुटे, पत्रकार संजय कदम, प्रमोद घरत, मंगेश भोईर, गणेश घरत, संतोष भोईर यांच्या हस्ते करण्यात आले.
या लीगचे हे 11 वे वर्ष होते. या लीगच्या स्पर्धेत या भागातील सहा संघांनी भाग घेतला.या स्पर्धेसाठी लाईन आळी, लोखंडे पाडा, घाटे आळी, मुनोत नगर, जय भवानी मित्र मंडळ कापड बाजार या संघांना व सामाजिक मंडळांना आमंत्रित केले जाते. ही लीग यशस्वी करण्यासाठी आयोजन कमिटीचे शंतनू घरत, ऋतिक बताले, जागृत भोईर, श्रीकांत भोपी, आदेश घरत, अनुराग घरत, ओमी भोपी, स्पर्श शेंडे, पुष्कर, भावेश घरत, विकी काळे आदींनी प्रयत्न केले.



## 15 दिवसात पाग बायपास जवळ गतिरोधक दिसेल.... उदय सामंत

दैनिक युवक आधार
योगेश सुतार / चिपळूण :

शहरातील पाग भागात महामार्गावर बायपास जवळ 15 दिवसात गतिरोधक जनतेला दिसेल असे आश्वासन पालकमंत्री उदय सामंत यांनी आज दिले. आज इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्रात महामार्ग कामाबाबत व अडचणींबाबत बैठक झाली. यावेळी भारतीय जनता पार्टी चे शहराध्यक्ष शशिकांत मोदी यांनी पाग भागात महामार्ग वर गतिरोधक का महत्वाचा आहे आणि त्या साठी सर्व नागरिक कसे प्रयत्न करीत आहेत आणि अपघात प्रमाण किती वाढले याची माहिती देताच पालकमंत्री सामंत यांनी लगेच जिल्हाधिकारी यांना कॉल करून सर्व माहिती दिली. तसेच राष्ट्रीय महामार्ग कार्यालय यांनीही हा गतिरोधक किती महत्वाचा आहे त्याचा अहवाल दिला आहे. त्या अहवालाचा व नागरिकांनी दिलेल्या निवेदनाचा आधार घेत लवकर काम होऊ दे असे त्यांनी जिल्हाधिकारी यांना सांगितले. यावळी महामार्ग काम मुळे पावसाळ्यात येणाऱ्या अडचणी, नळ पाईप, गटार स्वच्छता याबाबतही सकारात्मक चर्चा झाली. यावेळी त्यांना महामार्ग कामाबाबत निवेदन नागरिकाच्या वतीने दिले.



## केंद्रीयराज्यमंत्री रामदास आठवले येत्या दि.६ मे पासुन बौध्द राष्ट्रांच्या दौऱ्यावर

दैनिक युवक आधार
पनवेलः(आनंद पवार)
रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले हे येत्या दिनांक ६ मे पासुन बौध्द राष्ट्रांच्या दौऱ्यावर रवाना होणार आहे. केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले हे मुंबईतुन ६ मे ला ६ दिवसांच्या बौद्ध राष्ट्रांच्या दौऱ्यावर रवाना होणार आहेत. सहा दिवसांच्या या बौध्द राष्ट्रांच्या दौऱ्यामध्ये रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले हे प्रथम थायलँड त्यानंतर व्हिएतनाम आणि त्यानंतर कंबोडिया या तीन बौध्द राष्ट्रांचा दौरा करणार आहेत अशी माहिती रिपब्लिकन पक्षाच्या वतीने देण्यात आली आहे. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुध्दीस्टचे ते आंतरराष्ट्रीय उपाध्यक्ष आहेत.जागतिक स्तरावर बौध्दांचे ते नेते म्हणुन लोकप्रिय आहेत.त्यामुळे व्हिएतनाम येथे आंतरराष्ट्रीय बौद्ध परिषदेत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना बौध्द नेते म्हणुन प्रमुख पाहुणे म्हणुन निमंत्रीत करण्यात आले आहे.व्हिएतनाम मधील " हो ची मिन्ह "येथे आंतरराष्ट्रीय बौध्द परिषदेत ते सहभागी होणार आहेत.व्हितनाम, थायलॅन्ड आणि कंबोडिया येथील वरिष्ठ बौध्द धम्म गुरु,बौध्द अभ्यासक विचारवंत यांची या दौऱ्यात ना.रामदास आठवले भेट घेणार आहेत.विविध विषयांवर वार्तालाप करणार आहेत.भारतातील बौध्दधम्म चळवळ आणि आंतरराष्ट्रीय बौध्दधम्म चळवळी बाबत बोधिसत्व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार जगाला कसे मार्गदर्शक आहेत याबाबत ही या बौध्द राष्ट्रांमध्ये ना. रामदास आठवले माहिती देणार आहेत.भारतात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धम्मचक्र प्रवर्तन करुन फार मोठी धम्मक्रांती केली आहे.याची माहिती या बौध्द राष्ट्रां मध्ये ना.रामदास आठवले देणार आहेत.

# स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या पुण्यतिथी निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन

### भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची लाभणार प्रमुख उपस्थिती

### "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा; चिंध्रण ग्रामपंचायत सर्वोत्कृष्ट

दैनिक युवक आधार
पनवेल(प्रतिनिधी) पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती, कष्टकऱ्यांचे द्रष्ट नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३७ व्या पुण्यतिथी निमित्ताने ०७ मे २०२५ रोजी सायंकाळी ०६ वाजता उलवे नोड मध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज (दि. ०३) येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यामध्ये विशेषत्वाने पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२५"चे बक्षिस वितरण तसेच शिक्षण, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या गुणिजनांचा पारितोषिक सन्मान समारंभ त्याचबरोबरीने "मराठी पाऊल पडते पुढे" या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पत्रकार परिषदेस आमदार प्रशांत ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, कार्यकारी मंडळ सदस्य संजय भगत, भाजपचे नेरे मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले कि, स्वर्गीय जनार्दन भगत साहेबांनी अहोरात्र आपला देह 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या तत्वाच्या पूर्ततेसाठी कारणी लावला. तळागाळातल्या लोकांबदल त्यांना विशेष प्रेम होते. दारिद्रय व भूक यांच्याबद्दल अगदी मनापासून तळमळ होती. तळागाळातील समाजाचा उद्धार फक्त शिक्षणामूळेच होऊ शकते हे त्यांनी जाणले होते. आपली दूरदृष्टी, अविश्रांत श्रम, चिकाटी, धडाडी त्याचबरोबर व्यापक समाजहिताची तळमळ ही उदात्त भावना स्व. जनार्दन भगत साहेब यांच्या अंतःकरणात कायम होती. जनार्दन भगत साहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट राहिले असून त्यांनी अहोरात्र लोकांची सेवा केली. आयुष्यापेक्षा ध्येय्य मोठे असले पाहिजे, ही शिकवण त्यांनी समाजामध्ये रुजवत फक्त राजकारण नाही तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्याचबरोबर देवदूताची भूमिका सुद्धा पार पाडत त्यांनी समाजाला न्याय दिला आहे. लोकनेते दि. बा. पाटील यांचे उजवे आणि डावा हात म्हणून जनार्दन भगत साहेब आणि दत्तूशेठ पाटील यांना ओळखले जायचे. जनार्दन भगत साहेबांच्या आशीर्वादामुळे शिक्षण संस्थेची स्थापना झाली. त्यांचे कार्य सर्व समाजासाठी होते, त्यामुळे त्यांची स्फूर्ती नव्या पिढीला कायम मिळावी यासाठी या सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जात असल्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अधोरेखित केले.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी माहिती देताना सांगितले कि, स्वर्गीय जनार्दन भगत साहेबांनी केलेले कार्य सर्व समाजाचे हितकारक होते. त्यांच्या कार्यातून या भूमीला सामाजिक राजकीय ताकद मिळाली. त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाने स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार या वर्षीही देण्यात येत आहे. त्यानुसार तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या स्वच्छतेच्या निकषावर सर्वेक्षण करण्यात आले असून "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट अर्थात प्रथम क्रमांक चिंध्रण ग्रामपंचायतीने पटकाविले आहे. त्यांना १ लाख रुपये व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. , द्वितीय क्रमांक विचुंबे ग्रामपंचायत, तृतीय क्रमांक गव्हाण ग्रामपंचायत तर उत्तेजनार्थ पारितोषिक करंजाडे व तुराडे ग्रामपंचायतीने मिळविले आहे. द्वितीय क्रमांकाला ५० हजार रुपये व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांकाला २५ हजार रुपये व सन्मानचिन्ह तसेच दोन उत्तेजनार्थ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ११ हजार रुपये व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच नुकताच शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या स्वस्तिका घोष हिचा सन्मान करण्यात येणार असून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणिजनांचा सन्मान करण्यात येणार आहे. त्याचबरोबरीने 'देवकी मीडिया' प्रस्तुत व 'कलारंजना मुंबई' निर्मित, उदय साटम संकल्पित आणि दिग्दर्शित "मराठी पाऊल पडते पुढे" हा १०१ कलावंताचा संच असलेल्या कार्यक्रमाचा ४६०० वा प्रयोग सादर होणार आहे, अशीही माहिती देत या कार्यक्रमांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून करण्यात आले.

०७ मे रोजी सायंकाळी ६ वाजता उलवा नोडमधील रामशेठ ठाकूर मैदान येथे हा पुण्यतिथी व सत्कार समारंभ कार्यक्रम होणार असून या समारंभाला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची उपस्थिती लाभणार असून समारंभ अध्यक्ष जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती असणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, मंडळाचे सचिव परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, कार्यकारी मंडळ सदस्य अनिल भगत, प्रकाश भगत, संजय भगत, सभासद वसंत पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार असल्याची माहिती जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांनी दिली. भगतसाहेबांचे कार्य अफाट राहिले आहे. त्यांनी आमच्या विभागावर मोठे उपकार केले आहेत. भगतसाहेबांनी कुटुंबाला नाही पण समाजाच्या हितासाठी आयुष्य खर्च केले. बेळगाव सीमा प्रश्नावर एक वर्ष त्यांनी जेल भोगली आहे. त्यांचा त्याग आणि त्यांची स्मृती कायम राहावी यासाठी अशा कार्यक्रमांचे नियमित आयोजन करण्यात येत असल्याचेही वाय. टी. देशमुख यांनी नमूद केले.

## "स्नेहज्योतचं दिव्यांग सेवेसाठी नवं केंद्र कांदिवलीत सुरू"



दैनिक युवक आधार
प्रतिनिधी- किशोर रमाकांत गुडेकर
मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख
मुंबई (कांदिवली )समाजातील दिव्यांग व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी स्नेहज्योत दिव्यांग सेवा प्रतिष्ठान ही संस्था अतिशय पायाभूत कार्य करत आहे. बोरिवली येथील श्रीकृष्ण नगर मधील एका छोट्याशा जागेतून आपले दिव्यांग पुनर्वसनाचे कार्य महाराष्ट्रभर पोहोचवणाऱ्या स्नेहज्योत चे अजून एक दिव्यांग पुनर्वसन केंद्र आज अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर दिनांक 30 एप्रिल 2025 रोजी कांदिवली पूर्व येथे सुरू झाले आहे. स्नेहज्योत चे प्रामाणिक कार्य आणि दिव्यांग व्यक्तींच्या आयुष्यात स्नेहज्योत ने केलेल्या योगदानाने प्रभावित होऊन ज्येष्ठ उद्योगपती व समाजसेवक श्री पियुष भाई शहा यांनी गुंडेचा इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, कांदिवली पूर्व येथील एक जागा स्नेहज्योतच्या कार्यासाठी देऊ केली. पियुष भाई शहा यांच्या हस्ते फित कापून एका छोटेखानी कार्यक्रमात स्नेहजोतच्या या कांदिवली युनिटचे उद्‌घाटन झाले. दिव्यांग जगदीश जयस्वाल याला व्यवसायासाठी श्री पियुष भाई शहा यांच्या तर्फे इलेक्ट्रिकल ट्रायसिकल देण्यात आली. या कार्यक्रमाला ज्येष्ठ प्रोफेसर डॉक्टर हेमंत शिंदे ,उषा बांटीया तसेच उद्योजक व समाजसेवक श्री प्रदीप भाई शहा हे मान्यवर उपस्थित होते. संस्थेच्या सचिव सुधाताई वाघ, अध्यक्ष अपर्णा कायकिणी आणि खजिनदार श्री मिलिंद तेंडुलकर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत व ऋणनिर्देश केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संस्थेचे ट्रस्टी विजय कलमकर यांनी केले .कांदिवलीच्या या नवीन जागेत लवकरच दिव्यांग व्यक्तींसाठी फिजिओथेरपी आणि कौन्सिलिंग सेंटर सुरू करण्याचा स्नेहज्योतचा मानस आहे. दिनांक 5 मे ते 15 मे या दरम्यान स्लो लर्नर मुलांसाठी विशेष समर कॅम्प स्नेहज्योतने याच जागेत आयोजित केला आहे. या संदर्भात अधिक माहितीसाठी9820639230/7977001783 या क्रमांकावर संपर्क करावा.

## राळेगाव भाजपाकडून जातनिहाय जनगणना निर्णयाचे स्वागत

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :-जितेंद्र खोडे
राळेगावः-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेला जातनिहाय जनगणनेचा निर्णय ऐतिहासिक असल्याने राळेगाव भाजपाकडून सरकारचे अभिनंदन करीत आभार व्यक्त करण्यात आले.
मोदी सरकार ने जातनिहाय जनगणना करण्याचा जो ऐतिहासिक निर्णय घेतला त्या बदल त्यांचे आभार मानण्यासाठी आज दिनांक २ मे रोजी सकाळी 11 वाजता भारतीय जनता पार्टी कार्यालय राळेगाव येथे आभार बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय जनता पार्टी राळेगाव मंडळातर्फे जम्मु काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू पावलेल्या भारतीय पर्यटकांना व भारतीय जनता पक्षाचे नेते,विधान सभेचे माजी सदस्य आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते डॉ. रामदासजी आंबटकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

नंतर या कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी जातनिहाय जनगणना केली जावी हि मागणी विरोधकांची होती हा मोठा निर्णय आता केंद्र सरकारने घेतला असून येणाऱ्या काळात जनगणने बरोबर जातीय जनगणना केली जाणार आहे, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी माहीती दिली.आणी या निर्णयाचे विशेष करुन नरेंद्र मोदींचे आभार असे मत भाजपा तालुकाध्यक्ष छायाताई पिंपरे,माजी जिल्हा परिषद सदस्य चित्तरंजन कोल्हे,शहराध्यक्ष डॉ.कुणाल भोयर,माजी सभापती प्रशांत तायडे,माजी जिल्हा परिषद सदस्य उषाताई भोयर यांनी व्यक्त करीत भाजपा शहर व तालुक्याच्या वतीने अभिनंदन करत आभार व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाला गजानन लढी,गोपालभाऊ मशरू,बबनराव भोंगारे,प्रकाश पाल,रंजित ठाकरे,प्रदीप भोयर, गणेश देशमुख, आशिष इंगोले, निखिल राऊत,संदीप तेलंगे, दिनेश गोहणे, निलय घिनमीने प्रफुल कोल्हे,शुभम मुके,गोवर्धन



कठाणे, सागर वर्मा, अरुण देहारे,सुदर्शन शेंडे,सौरभ खडस्कर,महिला तालुक्याध्यक्ष वंदना कुटे,शितल राऊत, करुणा वानखेडे, मायाताई भुरसे, विद्या मेश्राम, कविता गेडाम,सिमा येडस्कर इत्यादी भाजपा पदाधिकारी, युवा मोर्चा, महिला पदाधिकारी,उपस्थित होते.

## वासांबे मोहोपाडा लवकरच नगरपरिषद होईल-खासदार सुनील तटकरे

### ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा हद्दीत डंपिंग

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी रसायनीः वासंबे ग्राम पंचायत एक हद्दीतील ग्रामस्थांसाठी अहोरात्र मेहनत करणाऱ्या गौरवशाली ग्राम पंचायत यांना सर्व प्रकारची शासकीय मदत करण्यास आनंद होतो, वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपच़ायतीची लोकसंख्या 60 हजार पार झाल्याने लवकरच वासांबे मोहोपाडा नगर परिषद करण्यासाठी आमदार महेश बालदी आणि मी प्रयत्न करणार असल्याचे गौरवशाली उदगार खासदार सुनील तटकरे यांनी मोहोपाडा ग्रामपंचायत कार्यालयात शनिवार दि.3 में रोजी काढले.
ग्रुप ग्रामपंचायत वासांबे यांनी सोलर दिवे आणि हायमॅक्स दिव्यांचे लोकार्पण आणि भूमिपूजन कार्यक्रम,दिव्यांग यांना घर घंटी वाटप, ग्राम पंचायत हद्दीतील नागरिकांना पिशव्या वाटप,ग्राम पंचायत स्थापना पासून सरपंच पदाचा कारभार करणारे सरपंच यांचा सत्कार कार्यक्रम खासदार सुनील तटकरे व आमदार महेश बालदी यांच्याहस्ते करण्यात आला,त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ग्राम पंचायत यांनी केलेल्या कामाचे त्यांनी कौतुक करून ग्राम पंचायत ला मिळालेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल IOS हे नामांकन प्राप्त झाले आहे, हे प्रमाणपत्र खासदार सुनील तटकरे यांनी सरपंच उमा मुंढे यांच्या कडे दिले. आपल्या प्रास्ताविक भाषणात खासदार सुनील तटकरे व आमदार महेश बालदी यांनी केलेल्या सहकार्य बद्दल धन्यवाद व्यक्त करून ग्राम पंचायत यांनी केलेल्या विकास कामांचा आढावा घेताना माझी वसुंधरा अभियान



अंतर्गत ५.० मध्ये वासंबे ग्राम पंचायत कोकण विभागात प्रथम असल्याचे सांगितले. वासांबे ग्राम पंचायत व परिसर यांचा विकास करायचा असेल तर नगर परिषद होणे गरजेचे आहे,परिसरातील पाताळगंगा नदी 32 किमी असून पाण्यावर प्रक्रीया करुन पाईपलाईनव्दारे कंपन्यांचे सांडपाणी खाडीत सोडून त्यासाठी आपण पाठपुरावा करीत असून खासदार सुनील तटकरे यांनी सहकार्य करावे असे आमदार महेश बालदी यांनी सांगून विकास कामांना लागणारे आर्थिक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.
यावेळी माजी सरपंच संदीप मुंढे,माजी उपसरपंच सुरेश पाटील, कैलास म्हात्रे, ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील,उपसरपंच भुषण पारंगे ,सर्व ग्रामपंचायत सदस्य ,कर्मचारी यांच्यासह विविध स्तरांतील मान्यवर ,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## "ज्यांच्या झोपड्या तोडल्या गेल्या, त्यांना मिळणार घरकूल : आ विनोद अग्रवाल"

### रेल्वे प्रशासनाने दोन वर्षांपूर्वी विकासकामांसाठी ३२ झोपड्या तोडल्या होत्या

दैनिक युवक आधार
सचिन बन्सोड गोंदिया
गोंदिया शहरातील डॉ. आंबेडकर वॉर्डामध्ये रेल्वे लाईनलगत नगर परिषदेच्या जागेवर गेल्या ३० वर्षांपासून झोपड्या बांधून राहत असलेल्या गरीब कुटुंबांच्या ३२ झोपड्या रेल्वे प्रशासनाने दोन वर्षांपूर्वी विकासकामांसाठी तोडल्या होत्या. त्यामुळे ही कुटुंबं बेघर झाली होती. ही कुटुंबं आर्थिक दृष्ट्या कमकुवत असल्यामुळे माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते घनश्याम पानतवने यांनी १६ कुटुंबांसाठी स्वतःच्या खर्चाने प्लॉट खरेदी करून दिले, तर उर्वरित १६ कुटुंबांना अत्यंत कमी दरात प्लॉट उपलब्ध करून देण्यात आले. या प्लॉटवर घरकुल योजनेचा लाभ मिळावा यासाठी या बेघर कुटुंबांनी एक वर्षापूर्वी अर्ज दाखल केले होते. मात्र काही कारणास्तव सर्व अर्ज रद्द करण्यात आले होते. या बाबतची माहिती गोंदिया विधानसभा क्षेत्राचे आमदार विनोद अग्रवाल यांच्याकडे पोहोचताच त्यांनी तात्काळ २ मे रोजी



कारवाई करत समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विनोद मोहतुरे, अपर तहसीलदार श्रीकांत कांबळे यांना संबंधित जागी–डॉ. आंबेडकर वॉर्ड येथे–बुलावून घेतले. त्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन बेघर कुटुंबांशी संवाद साधला, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि सर्व ३२ कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ लवकरच मिळवून देण्याचे आश्वासन दिले.यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या कार्यवाही तात्काळ करण्याचे निर्देशही दिले. या भेटीत घनश्याम पानतवने, बंटी पंचबुद्धे, व सामाजिक कार्यकर्ते अमित भालेराव देखील उपस्थित होते.

दखल

## दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभागातर्फे उरण पिरवाडी समुद्र किनाऱ्यावरील स्वच्छता मोहिमेचे यशस्वी आयोजन करून दिला सामाजिक संदेश.

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी रणिता ठाकूर

उरण रायगड : रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात सामाजिक कार्यात सक्रिय असणाऱ्या दुर्ग मावळा प्रतिष्ठान समुहाच्या माध्यमातून





महाराष्ट्र तसेच कामगार दिनाचे अवचित्य साधून १ मे २०२५ रोजी उरण शहराला लाभलेला प्रसिद्ध पर्यटन स्थळ पिरवाडी समुद्रकिणारा येथील पर्यटकांकडून होत असलेल्या विविध प्रकारच्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी स्वच्छता मोहीम हाती घेतली होती. सामाजिक कार्याची जाणीव ठेवत ही स्वच्छता मोहिम हाती घेण्यात आली होती. "एक दिवस समाजसेवेसाठी" असे आवाहन करत प्रतिष्ठानने एक सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला. या मोहिमेत संपर्कातील समाजसेवकांना देखील एकत्र येण्यासाठी आवाहन केले होते. या सदर मोहिमेत पिरवाडी समुद्रकिनाऱ्यालगत असलेली सर्व कचरा साफ करण्यात आली, यामध्ये दारूच्या बॉटल, प्लास्टिकच्या पिशव्या यांचा जवळजवळ एक टेम्पो भरून कचरा काढण्यात आला. या मोहिणेसाठी दुर्ग मावळा प्रतिष्ठानचे सर्व शिलेदार, त्याचबरोबर उरण तालुक्यात कार्यरत असणारे सामाजिक कार्यकर्ते नागेंद्र म्हात्रे, विनोद कोळी, गीता म्हात्रे, अजय फळे, लिलेश्वर ठाकूर, रुपेश ठाकूर, नितीन म्हात्रे, मिलिंद म्हात्रे, युट्युबवर मी बेलपाडकर (गणेश कोळी) इत्यादी उपस्थित होते. आलेल्या सर्व सामाजिक कार्यकर्त्यांनी सदर स्वच्छता मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्यामुळे दुर्गा मावळा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राज म्हात्रे यांनी आभार व्यक्त केले. असेच एकत्र येऊन आपण उरणकरांनी वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हायला हवे असे प्रत्येकाने मत व्यक्त करत सदर स्वच्छता मोहिमेचा कार्यक्रम संपन्न झाला.

## लायन्स सरगम मोफत संगीतोपचार केंद्राचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले उदघाटन

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)

सरगम लायन्स क्लब चा महत्त्वाकांक्षी उपक्रम लायन्स सरगम म्युझिक थेरपी सेंटर चे पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांचे हस्ते मोठ्या उत्साहात उदघाटन संपन्न झाले. याप्रसंगी प्रांतपाल एन आर परमेश्वरन, प्रथम प्रांतपाल संजीव सुर्यवंशी तसेच डिस्ट्रिक्ट मधील विविध पदाधिकारी उपस्थित होते. सरगम क्लबच्या अध्यक्ष डॉ मानदा पंडित यांचे संकल्पनेतून हा उपक्रम सुरु झाला आहे. सरगम क्लबच्या अध्यक्ष मानदा पंडित यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि या उपक्रमाबद्दल माहिती दिली.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, आजच्या तणावपूर्ण जगात, औषधे मदत करत असताना, पूर्णतः लवकर बरे होण्यासाठी आणि आंतरिक शांती आणण्यासाठी म्युझिक थेरपीसारखे पर्यायी उपचार आवश्यक आहेत. मोफत म्युझिक थेरपी देऊन या उदात्त कार्याला हातभार लावल्याबद्दल प्रशांत ठाकूर यांनी लायन्स सरगम क्लबचे कौतुक केले. प्रमुख अतिथी प्रांतपाल एन आर परमेश्वरन आणि प्रथम प्रांतपाल संजीव सुर्यवंशी यांनी सुद्धा फक्त 2 वर्षात क्लब ने केलेल्या विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करुन पनवेल परिसरात लायन्सचे नाव उज्वल केल्याबद्दल सरगम क्लबचे अभिनंदन आणि कौतुक केले. या कार्यक्रमात उपस्थिताना आदित्य दोशी यांनी संगीतोपचार प्रात्यक्षिक दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय गोडसे यांनी केले तर आभार प्रेमेंद्र बहिरा यांनी मानले. या संगीतोपचार केंद्रात दर गुरुवारी 6 ते 8 या वेळात दिव्यम ज्योती होलिस्टिक सेंटर, 502, श्री गणेश अपार्टमेंट, सुश्रुषा रुग्णालयासमोर पनवेल येथे मोफत संगीतोपचार देण्यात येणार आहेत त्यासाठी पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी आणि अधिक माहितीसाठी मानदा पंडित 7700976352, आदित्य दोशी 9821681026, प्रेमेंद्र बहिरा 9820974715, संजय गोडसे 9869347300 यांच्याशी संपर्क करावा असे यावेळी संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले. उदघाटन कार्यक्रमा साठी रिजन चेअरमन सुयोग पेंडसे,झोन चेअरमन अल्केश शहा, सचिव प्रेमेंद्र बहिरा, संजय गोडसे, डॉ आदित्य दोशी, संध्या महानुभाव, ओंकार खेडकर, अश्विनी खेडकर, सुषमा पन्हाळे, महेंद्र लोहार, प्रदीप भट्टाचार्य तसेच डिस्ट्रिक्ट मधील अनेक पदाधिकारी आणि पनवेल मधील नागरिक उपस्थित होते.

# पनवेल रेल्वे स्थानकातील समस्या मार्गी लावण्याची आमदार प्रशांत ठाकूर यांची केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे मागणी

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी) पनवेल रेल्वे स्टेशनच्या विकासासाठी तातडीने उपाययोजना करण्याची विनंती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे. नामदार आश्विनी वैष्णव रेल्वेच्या महत्वपूर्ण स्थानकांना भेट देत असून त्यांनी आज पनवेल रेल्वे स्थानकाला भेट दिली. यावेळी आमदार आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंत्री महोदयांची भेट घेत त्यांना निवेदन देऊन पनवेल रेल्वे स्थानकातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन उपाययोजना करण्याची मागणीही केली आहे. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, पनवेल हे शहर रस्ते, परिवहन आणि रेल्वे वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आणि गतीशील केंद्र ठरले आहे. याची भौगोलिक व सामाजिक रचना लक्षात घेता, पनवेल हे "मुंबईचे प्रवेशद्वार" मानणे उचित ठरेल.कोकण रेल्वे, मुंबई–नवी मुंबईकडे येण्या जाणाऱ्या रेल्वे सेवा, पुणे मार्गावरील गाड्यांसाठी पनवेल एक अत्यंत महत्त्वाचा जंक्शन स्टेशन बनले आहे. याशिवाय पनवेल जवळील उलवे–द्रोणागिरी नोडमध्ये होत असलेला झपाट्याने विकास, नुकतेच सुरू झालेले अटल सेतू, जेएनपीटी तसेच लवकरच कार्यान्वित



होणारा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या सर्व बाबीमुळे या परिसरात व्यापारी वसाहत व लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. या पार्श्वभूमीवर, पनवेल रेल्वे स्थानकाचा अत्याधुनिक स्वरूपात विकास करणे व प्रवाशांच्या सुविधेसाठी आवश्यक उपाययोजना करणे हे अत्यंत गरजेचे असून प्लॅटफॉर्म क्रमांक एक आणि चार मधील सबवेला नवीन पनवेल (पूर्व) पर्यंत वाढवणे, सध्याचा फूट ओव्हर ब्रिज लोकसंख्येच्या तुलनेत अपुरा असून, त्याऐवजी नवीन व अधिक रुंद एफओबी उभारणे गरजेचे आहे. पनवेल रेल्वे स्टेशनच्या पूर्व बाजूस पार्किंग डेकचे काम अद्याप अपूर्ण असून, त्यामुळे वाहतूक कोंडी व पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्या निर्माण होत आहेत. हे काम तातडीने पूर्ण करावे. प्रत्येक प्लॅटफॉर्मवर एक्सलेटर आणि दिव्यांग, वृद्ध व गरोदर महिलांसाठी लिफ्ट्स उपलब्ध करणे आवश्यक आहे. रेल्वे स्टेशनची इमारत अत्यंत धीम्या गतीने उभी राहात आहे, त्यामुळे या कामास फास्ट ट्रॅकवर नेण्याची गरज आहे. हार्बर लाइन, मुख्य लाइन व लोकल रेल्वे लाईन यामधील इंटरकनेक्शन लूप तयार करणे गरजेचे आहे, जे आपत्कालीन परिस्थितीत उपयुक्त ठरू शकणार आहे. पनवेल रेल्वे स्टेशनाला जरी 'अ' दर्जा प्राप्त असला, तरी येथे प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सुखकर प्रवासासाठी या सर्व गोष्टींवर तातडीने कृती करण्यात यावी, आणि त्यासाठी या विषयाकडे आपण वैयक्तिक लक्ष देऊन संबंधित अधिकाऱ्यांची एक बैठक आयोजित करण्यात यावी, अशी विनंती आमदार प्रशांत ठाकूर यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.

# सती चिंचघरी प्राथमिक शाळेत समर कॅम्पचा उत्साहात शुभारंभ



दैनिक युवक आधार योगेश सुतार

चिपळूण : सहयाद्रि शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा खेर्डी-चिंचघरी (सती) ता.चिपळूण या विद्यालयात समर कॅम्पचा शुभारंभ मोठया उत्साहात नुकताच संपन्न झाला.वार्षिक परीक्षा संपल्या की, सर्वत्र शिबीर सुरू होतात, भरमसाठ शुल्क आकारले जाते, अशा वेळी पालकांच्या मनात आपल्या मुलाला देखील अशा संस्कार शिबीराला पाठवायचे असते, मात्र आर्थिक अडचणीमुळे ते पाठवू शकत नाहीत, याचा विचार करून संस्थेने या शाळेतील व शाळेच्या परिसरातील सर्व शाळांच्या विद्यार्थ्यासाठी समर कॅम्पचे आयोजन केले आहे. वर्षभर अभ्यासक्रम शिकवित असताना मर्यादित वेळेमुळे संस्काराच्या बाबी थोडया मागे राहतात. यासाठी २ मे ते ४ मे या कालावधीत बाल संस्काराचा समर कॅम्प आयोजित करण्यात आला आहे.

या शिबीरात योगा, ध्यानधारणा, जनरल नॉलेज, टीम बिल्डिंग,विविध देशी खेळ, हस्ताक्षर सुधारणा, मातीकाम, कागदकाम, चित्रकला, रांगोळी, निसर्ग सहल, पपेट शो, मेहंदी, हेअर स्टाईल, नेल आर्ट, स्टोन पेन्टिंग , इंग्लिश स्मरणशक्ती, एखादा विषय देवून त्यावर स्वमताचे सादरीकरण यासारखे विषय घेवून त्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.या शिबीराचे उद्घघाटन राधागोविंद फाउंडेशनचे कार्याध्यक्ष व सहयाद्री शिक्षण संस्थेचे युवा नेतृत्व श्री.अनिरुद्ध निकम सर, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा सौ. साक्षी मोडक, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. अरविंद सकपाळ सर,इंग्लिश मिडिअम स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ.समीक्षा पिटले, शिशुविहारच्या मुख्याध्यापिका सौ. ममता ठसाळे व पालक यांच्या हस्ते दिपप्रज्वलन व प्रतिमापूजन करून करण्यात आले. शालेय परिपाठाने संस्कार शिबीराची सुरुवात झाली. यावेळी श्री. अनिरूद्ध निकम सर यांनी संस्कार याबाबत अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या हस्ते या शिबिरात सहभागी झालेल्या प्रत्येक मुलाला सन्मानपूर्वक टोपी वाटप करण्यात आले. मुलांना पौष्टिक नाष्टा, एक फळ व ज्यूसचे वाटप देखील करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ. अपूर्वा शिंदे यांनी तर आभार सौ. मनिषा कांबळी यांनी मानले .या कार्यक्रमासाठी प्राथमिक शाळा, शिशुविहार व धोंडिरामशेठ दाभोळकर इंग्लिश मिडिअम स्कूलचे सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

## सिल्लोड तालुक्यातील जांभई येथे १ लाख १० हजार किंमतीच्या गांजासह आरोपीला अटक: सिल्लोड ग्रामीण पोलिसांची कारवाई

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :- योगेश पालोदकर

सिल्लोड : ग्रामीण पोलिसांनी तहसीलच्या जांभई शिवारात छापा टाकून सुमारे ५ किलो ५० ग्रॅम गांजा जप्त केला, ज्याची किंमत १ लाख १० हजार रुपये असल्याचे सांगितले जाते आणि आरोपीलाही अटक केली. आरोपीचे नाव विष्णू पांडुरंग शिंदे (४६ वर्षे) असे आहे, जो जांभई शिवारात राहणारा आहे. सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवार, १ मे रोजी ग्रामीण पोलिसांना माहिती मिळाली की, जांभई येथील रहिवासी विष्णू पांडुरंग शिंदे, वय ४६, नावाच्या व्यक्तीने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीरपणे गांजा विकण्याच्या उद्देशाने त्याच्या फार्म हाऊसमध्ये गांजा ठेवला आहे. ही माहिती ताबडतोब प्रभारी अधिकारी, पोलिस निरीक्षक विजय सिंह राजपूत यांना देण्यात आली आणि वरिष्ठांना कळवण्यात आले. पोलीस निरीक्षक राजपूर यांनी पोलीस अधीक्षक मयंक माधव (आयपीएस) आणि उपनिरीक्षक लहू घोडे यांच्यासह पोलीस कर्मचारी आणि नायब तहसीलदार विजय माला पुपलवाड, दोन सरकारी साक्षीदार आशिष औटी, नीलेश देशमुख यांच्यासह सदर ठिकाणी छापा टाकला आणि एकूण ५ किलो ५० ग्रॅम गांजा जप्त केला. त्याची अंदाजे किंमत १,१०,००० रुपये असल्याचे सांगितले जाते. या प्रकरणात, उपनिरीक्षक लहू घोडे यांच्या तक्रारीवरून, आरोपी विष्णू शिंदेविरुद्ध कलम २०(ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास सचिन क्षीरसागर करत असून आरोपी विष्णू पांडुरंग शिंदे याला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असता त्याला एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

वरील कारवाई पोलीस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजयसिंह राजपूत, सचिन सोनार, अनंत जोशी, यतीन कुलकर्णी, अमोल रोकडे, दीपक इंगळे, निवृत्ती जाधव, पंडित फुले, विनोद नागलोड, वैजनाथ चव्हाण यांनी केली.

# रेवदंडा समुद्र चौपाटी 'हाऊसफुल्ल'; पर्यटकांची उसळलेली गर्दी, वेडिंग फोटोशूटसाठीही पसंती, रानमेव्याच्या चवीने पर्यटक मंत्रमुग्ध

दैनिक युवक आधार
निलेश फुंडे रेवदंडा

रेवदंडा कोकणातील निसर्गसंपन्न आणि ऐतिहासिक वारसा लाभलेलं रेवदंडा सध्या पर्यटकांचे 'ड्रीम डेस्टिनेशन' बनले आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमुळे समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची जबरदस्त गर्दी उसळली असून, चौपाटी अक्षरशः 'हाऊसफुल्ल' झाली आहे. सायंकाळच्या वेळेस रुपेरी वाळूवर चालताना, फेसाळणाऱ्या लाटांमध्ये खेळताना आणि झुळझुळणाऱ्या वाऱ्याचा आनंद घेताना पर्यटक एक वेगळीच दुनिया अनुभवत आहेत.मुंबई, पुणे, ठाणे, नाशिकसह राज्यभरातून पर्यटक मोठ्या प्रमाणावर रेवदंडा आणि चौल परिसरात दाखल झाले आहेत. येथील शांत, स्वच्छ आणि सुरक्षित समुद्रकिनारा, नारळी-पोफळींच्या बागा, तसेच ऐतिहासिक आगरकोट किल्ला ही ठिकाणं पर्यटकांना आकर्षित करत आहेत. विशेष म्हणजे, आजपर्यंत समुद्रस्नानादरम्यान कोणतीही दुर्घटना न झाल्यामुळे रेवदंडा चौपाटीची 'सुरक्षित समुद्रकिनारा' म्हणून खास ओळख तयार झाली आहे.

चौपाटीवर छोटे-मोठे ग्रुप्स क्रिकेट खेळताना, लाटा अंगावर झेलत जल्लोष करताना, वाळूत बसून नारळपाणी, सरबत आणि भेळ चाखताना दिसून येत आहेत. सुट्ट्यांमध्ये बच्चे कंपनीची रेलचेल तर अधिकच वाढलेली आहे.रेवदंड्याची अजून एक विशेषता म्हणजे इथं फ्री वेडिंग फोटोशूटसाठीही जोडप्यांची पसंती. लग्न ठरलेली तरुण मंडळी समुद्राच्या पार्श्वभूमीवर, ऐतिहासिक आगरकोट किल्ल्याच्या साक्षीने, आपले क्षण कॅमेऱ्यात टिपून घेत आहेत. निसर्ग, इतिहास आणि प्रेमाचा त्रिवेणी संगम असलेलं हे ठिकाण नवदाम्पत्यांसाठी 'ड्रीम लोकेशन' ठरत आहे.याशिवाय, स्थानिकांनीही कॅम्पिंग व्यवसायात झेप घेतल्याने पर्यटकांना मुक्कामासाठी सुंदर पर्याय उपलब्ध झाले आहेत. शनिवार-रविवारी येथे पर्यटकांची विशेष गर्दी पाहायला मिळते. सकाळी किल्ल्याला भेट, दुपारी समुद्रस्नान आणि सायंकाळी सूर्यास्ताचा नजारा, असा एक परिपूर्ण पर्यटन दिनक्रम येथे अनुभवता येतो. रानमेव्याची चवही खास आकर्षण रेवदंडा परिसरातील उन्हाळी रानमेवा – ओले काजू, जांभळं, करवंद, रांजण, ताडगोळे यांची चव चाखण्यासाठीही अनेक खवय्ये येथे गर्दी करत आहेत.



स्थानिक विक्रेत्यांकडून मिळणारा हा ताजातवाना रानमेवा पर्यटकांच्या जिभेवर रूचत असून, विशेषतः ताज्या समुद्री मासळीच्या चवीनं खवय्ये मंत्रमुग्ध होतात. पापलेट, सुरमई, कोळंबी, कालव, चिंबोरी (खेकडे) हे मासे थेट समुद्रातून ताजेतवाने मिळत असल्याने रेवदंडा हे मासेप्रेमींसाठी एक खास पर्वणी ठरत आहे.कोकणातील पारंपरिक चव अनुभवण्याची ही खास संधी ठरत आहे. एकंदरितच, उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये निसर्ग, समुद्र, इतिहास आणि चविष्ट रानमेवाचा संगम अनुभवण्यासाठी रेवदंडा हे ठिकाण पर्यटकांचं आवडतं ठिकाण बनलं आहे.

# शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी उभारण्यात येत आहे खारघर मध्ये 'ट्राफिक पार्क'

दैनिक युवक आधार
पनवेल, दि.3 (वार्ताहर) : शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींना वाहतुकीची माहिती व्हावी, सिग्नल यंत्रणा समजावी आदींसह वाहतुकीचे नियम विद्यार्थी-विद्यार्थिनींना बालपणापासून अंगवळणी पडावेत या उद्देशाने पनवेल महापालिका तर्फे खारघर सेक्टर-35 मध्ये 'ट्रॅफिक पार्क' उभारण्यात येणार असून, येत्या मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या 'ट्राफिक पार्क'चे भूमिपूजन होणार आहे.

पनवेल आणि नवी मुंबई परिसरात प्रथमच 'ट्राफिक पार्क' उभारण्यात येणार असल्यामुळे या 'ट्राफिक पार्क' मध्ये शालेय विद्यार्थ्यांची रेलचेल असणार आहे. पनवेल महापालिका हद्दीत प्रथमच आणि सर्वात मोठे उद्यान असलेले 'ट्राफिक पार्क' उभे राहणार असल्यामुळे खारघर मधील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. 'सिडको'ने खारघर वसाहत निर्माण करताना सेक्टर-2, सेक्टर-21 परिसरात सेक्टर निहाय उद्यान आणि खेळाचे मैदान विकसीत केले आहे. मात्र, उंच इमारतीचा परिसर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खारघर सेक्टर-30 ते सेक्टर- 36 परिसरात उद्यान आणि खेळाचे मैदान विकसित करण्याकडे 'सिडको'ने दुर्लक्ष केले. पनवेल महापालिका आस्तत्वात आल्यावर खारघर सेक्टर- 35एफ, प्लॉट नंबर-9 ए मधील 9 हजार चौरस मीटर जागेत 15 कोटी 81 लाख 25 हजार रुपये खर्च करुन महापालिका तर्फे 'ट्राफिक पार्क' उभारले जाणार आहे. या 'ट्राफिक पार्क' मध्ये लहान मुले-मुलींसाठी वाहतुकीचे नियम, वाहतूक व्यवस्थापन या विषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. यासाठी एक क्लासरुमही सुरु केली आहे. वाहन कसे चालवावे याची माहिती देखील दिली जाणार आहे. तसेच दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी ड्रायव्हींग ट्रॅक,वाहतुकीच्या नियमाचे धडे देणारे खेळाचे मैदान, रोड क्रॉसिंग, रेल्वे, रेल्वे स्थानक, क्लॉक टॉवर, व्यासपिठ, पिण्याचे पाणी, बस थांबा, स्थिर रेल्वे ट्रॅक, पेट्रोल पंप, रुग्णालय,पोलीस

**पनवेल महापालिका आयुक्तांच्या मार्गदर्शनानुसार खारघर मध्ये उभारल्या जाणाऱ्या 'ट्राफिक पार्क'चे भूमिपूजन येत्या मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होणार आहे. दोन वर्षात उद्यानाचे काम पूर्ण केले जाणार आहे. पनवेल आणि नवी मुंबई महापालिका हद्दीतील सदर पहिले 'ट्राफिक पार्क' असणार आहे. लहान मुलेमुली आणि पालकांसाठी आकर्षक असे 'ट्राफिक पार्क' असणार आहे. -**
**राजेश कर्डीले, उप अभियंता - पनवेल महापालिका.**

================================

ठाणे, तिकीट घर, सुरक्षा कॅबिन, शाळा, पदपथ, उद्यानात बसण्यासाठी सोय, इलेक्ट्रिक मोटार बाईक आणि कारसह सायकल ट्रॅक, ॲम्पिथिएटर, पादचारी पूल, बफर झोन, पोलिसांचे शिल्प, शिल्प कलेतील पुरुष, पाम ट्री अव्हेन्यू, गुरांचे शिल्प अभिमुखता केंद्र, आर्कषक गेट, लहान मुलांसाठी खेळाचे मैदान, सायकल ट्रॅक, बच्चे कंपनीसाठी आकर्षक खेळणी, संध्याकाळी जॉगिंग ट्रॅकवर फेरफटका मारण्यासाठी गेल्यानंतर खाण्याचा मोह झाल्यास फूड कोर्ट, आकर्षक उद्यान, रंगीबिरंगी फुलांची नजरेच्या टप्प्यात सामावणारी उद्यान अत्याधुनिक स्वरुपाची महिला आणि पुरुषांसाठी शौचालय आदी सुविधा 'ट्राफिक पार्क' मध्ये असणार आहेत. सेंट्रल पार्क नंतर पनवेल आणि नवी मुंबईतील पहिले ट्राफिक पार्क असल्यामुळे या ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांची रेलचेल असणार आहे.

